# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे कुऱ्हा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे आदिवासी गोटुल समाजाच्या ताब्यात असलेल्या जागेचा पट्टा मिळणेबाबत**

**(१) ३८१५५ (०८-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुऱ्हा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे आदिवासी गोटुल समाजाच्या ताब्यात असलेल्या जागेचा पट्टा मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधीनी दिलेले निवेदन जिल्हाधिकारी अमरावती यांनी उचित कार्यवाही करण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी तहसिलदार, तिवसा यांच्याकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे कुऱ्हा येथील आदिवासी गोटुल समाजाच्या ताब्यात असलेल्या जागेचा पट्टा या आदिवासींना मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१०/०८/२०१५ चे निवेदन जिल्हाधिकारी, अमरावती यांनी तहसिलदार, तिवसा यांच्या कार्यालयाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविले आहे. सदर निवेदनावर तहसिलदार, तिवसा यांच्या कार्यालयाकडून अध्यक्ष, आदिवासी गोटूल गोंड समाज, कु-हा यांचेकडून सदरचे अतिक्रमण हे दि. ०४/०४/२००२ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१/०१/१९९५ पूर्वीचे असलेबाबत पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर पुरावे प्राप्त झाल्यानंतर तपासणीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**कळवा (जि.ठाणे) परिसरातील खारलँड जमिनीवर "Central Business District" प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२) ४१८७४ (२०-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) परिसरात असलेल्या खारलँडच्या जमिनीवर "Central Business District" प्रकल्प उभारण्यासंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील विकासाच्या दृष्टीने महत्वाचा ठरणारा "Central Business District" प्रकल्पाची जलदगतीने उभारणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कळवा, ता.जि.येथील जमिनीवर ठाणे जिल्ह्यातील विविध प्रशासकीय प्रकल्प राबविण्याबाबत दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या प्रयोजनासाठी दिलेली जमीन वगळता उर्वरित जमिनीवर विभागीय आयुक्त, कोकण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने Central Business District चा बृहत आराखडा तयार करुन घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली असून नगर नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणी Central Business District (सीबीडी) विकसित करण्याची व्यवहार्यता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मदतीने तपासण्यात येत आहे.

---

**चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील शहर व ग्रामिण भागात असलेल्या भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याबाबत**

**(३) ४९०५८ (२४-०६-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील शहर व ग्रामिण भागात असलेल्या भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये घोषीत केल्याने प्लॉटची खरेदी विक्री करण्यात येत असुन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी माहे ११ फेब्रुवारी, २०१४ व माहे २० फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या आदेशान्वये अशा जमिनीची चौकशी करुन भोगवटदार वर्ग-१ मधुन भोगवटदार वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाविरुध्द एका खाजगी व्यावसायीकाने शासनाकडे फेरतपासणी अर्ज सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त यांचे उपरोक्त दोन्ही आदेशास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्थगिती आदेशाची अंमलबजावणी अदयापर्यंत सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८)** (१), (२), (३), (४) व (५) होय, विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ११/०२/२०१४ च्या पत्रान्वये चिखलदरा विशेष विकास प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्रातील जमिनी भोगवटदार वर्ग-२ असून अशा जमिनींचे हस्तांतरण जिल्हाधिकारी, अमरावती व उप विभागीय अधिकारी, धारणी यांच्याशी सल्ला मसलत करून/मार्गदर्शन घेवूनच करण्यात यावे असे आदेश नगर रचना अधिकारी, सिडको, चिखलदरा, जि.अमरावती यांना दिले होते. तसेच दि. २०/०२/२०१४ च्या पत्रान्वये मा. लोकप्रतिनिधी यांना त्यांच्या पत्राच्या अनुषंगाने तपशीलवार वस्तुस्थिती अवगत करण्यात आली होती. सदर प्रकरणी एका खाजगी व्यावसायिकाने शासनाकडे अपील दाखल केल्यानंतर उपरोक्त दोन्ही आदेश/निर्देश तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी दि १२/०९/२०१४ रोजी रद्द केले होते. उक्त आदेशाविरुध्द विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि. १०/१२/२०१४ रोजी पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता. सदर पुनर्विलोकन अर्ज मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी दि. २६/१०/२०१६ रोजी आदेश पारीत करून निकाली काढला असून तत्कालीन मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे दि. १२/०९/२०१४ चे आदेश कायम केले आहेत. तथापि जिल्हाधिकारी, अमरावती यांनी शासनाकडे सदर प्रकरणी मार्गदर्शन अपेक्षिले आहे.

---

**फलाटेवाडी, होटगी स्टेशन व आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापुर, जि.सोलापुर) गावांच्या हद्दीत औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारल्याबाबत**

**(४) ५६४१४ (१९-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलाटेवाडी, होटगी स्टेशन व आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापुर, जि.सोलापुर) गावाच्या हद्दीतील सुमारे २१०० एकर जमीनीच्या सपाटीकरणाचे कंत्राट एन.टी.पी.सी कंपनीने के.जे. इन्फ्रा कंपनीला कोणत्या अटी व शर्तीवर दिले होते,

(२) असल्यास, के. जे. इन्फ्रा कंपनीला विनापरवाना केलेल्या उत्खननापोटी तहसिलदार दक्षिण सोलापुर यांनी आकारलेल्या रु. ३०३९.११ कोटी रुपयांच्या दंडापैकी आतापर्यंत किती रक्कम संबंधित कंपनीकडून वसूल करण्यात आली आहे,

(३) असल्यास, इतर १६ कंपन्यांनी केलेल्या बेकायदेशीर उत्खनना प्रकरणी तहसिलदार दक्षिण सोलापुर यांनी आकारलेल्या रु. ११२.२७ कोटी इतक्या दंडाच्या रक्कमेपैकी आतापर्यंत किती रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) व (३) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दंडाची रक्कम भरणा करुन संबंधित कंत्राटरांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) सदर ठिकाणी एन.टी.पी.सी.चा औष्णीक ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून त्यासाठी जमीन सपाटीकरणाचे व इतर कामासाठी एन.टी.पी.सी. या कंपनीकडून विविध कंपन्यांना कंत्राट देण्यात आले होते. कंत्राटदार कंपन्यांनी पूर्व परवानगी न घेता अवैध उत्खनन केल्याचे आढळून आल्याने सदर कंत्राटदार कंपन्यांना तहसिलदार यांनी नोटीसा काढून खुलासा मागविला असता विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्याने दंडात्मक रक्कम भरणेबाबतचे आदेश तहसिलदार यांनी निर्गमित केले आहे. त्यापैकी के.जे.इन्फ्रा कंपनीला रु.३,०३,९९,१३,८००/- इतक्या रक्कमेचा दंड आकारण्याचे आदेश पारित केले आहे. सदर आदेशाविरुध्द उक्त कंपनीने जिल्हा सत्र न्यायालय, सोलापूर येथे क्र.१०५३/१५ अन्वये दावा दाखल केला असून मा.न्यायालयाने अंतिम आदेश होईपावेतो तहसीलदार यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

इतर १६ कंपन्यांनी अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तहसीलदार, दक्षिण सोलापूर यांनी रु.११२.२७ कोटी इतक्या रक्कमेच्या पारित केलेल्या दंडात्मक आदेशाविरुध्द अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल दाखल केले असून अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी १४ कंपन्यांचे अपिल अर्ज फेटाळून दंडात्मक आदेश कायम केले असून अन्य एका कंपनीच्या प्रकरणात फेरतपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.

अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दंड कायम केलेल्या १४ कंपन्यांना दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित करण्यात आले असून दंड वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी जागा देण्याबाबत

**(५) ६४२७० (११-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी तातडीने जागा उपलबध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी महसूल चांदूर रेल्वे यांच्याकडे दिनांक १३, जून २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१३/०६/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांना लेखी निवेदन दिले आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ०५/०५/२०१८ च्या पत्रान्वये सध्या अस्तित्वात असलेल्या नांदगाव खंडेश्वर येथील तहसिल कार्यालयाची जुनी झालेल्या इमारतीच्या जागी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचे प्रस्तावित असल्याचे कळविले आहे. सदरहू तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या रुपये ७७१.५५/- लाख किमतीच्या अंदाजपत्रकास दि. २२/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान केली आहे.

---

**पंचायत समिती, अमरावती येथील भातकुलीची इमारत तथा खुली जागा दप्तरी जिल्हा परिषद, अमरावती यांचे नावे करणेबाबत**

**(६) ६७९२३ (१६-१२-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती भातकुलीची इमारत, खुली जागा तथा शिट नं.३१ प्लॉट नं.१७ ही जागा तालुका भुमिअभिलेख, अमरावती यांनी दप्तरी जिल्हा परिषद, अमरावती यांचे नावे करणेबाबतचा शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरीता प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरहू प्रकरणी दि. १६/०७/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सादर केलेला प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयामार्फत शासनास दि. २२/०५/२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

**मौजे वडगाव बु. (ता.हवेली, जि.पुणे) येथील ग्रामस्थांना प्रॉपर्टीचे हक्क देण्याबाबत**

**(७) ७४१५० (१२-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडगाव बु. (ता.हवेली, जि.पुणे) या नदी काठावरील गावामध्ये सन १९३० वा त्यादरम्यान पोटफुगीची साथ आल्यामुळे तेथील बहुसंख्य रहिवासी बाधित होऊन दगावले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील बहुसंख्य परीजन दगावल्यामुळे गावातील रहिवाश्यांनी मूळ ठिकाणावरून स.नं.४३ व ४९ या गायरान क्षेत्रावर वसती केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी वसती केलेल्या २६६ ग्रामस्थांची नावे अद्यापपर्यंत त्यांच्या प्रॉपर्टी कार्डवर दाखल झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी बाधित ग्रामस्थांना प्रॉपर्टीचे हक्क देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) वडगाव बु., ता.हवेली येथील स.नं.४३ व ४९ मधील ग्रामस्थांच्या प्रॉपर्टी कार्डवर नावे दाखल करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर शासनाच्या स्थायी धोरणानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) ७७००४ (१२-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील मंजूर झालेल्या शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या नियोजीत भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी तिवसा-भातकुली यांना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले असूनसुद्धा अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे शेंदूरजना बु. (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील ई क्लास सर्वे क्रं.११०/१२.२६ हे.आर.जमिनीपैकी ०.५० हे.आर जमिनीवर नाबार्ड अंतर्गत नविन शासकीय गोदामांचे बांधकाम करण्यात येणार असून त्या जागेची नोंद महसुल अभिलेखामध्ये करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी तिवसा-भातकुली यांना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे ममदापूर, (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील मंजूर आरोग्य केंद्राकरिता ई वर्ग जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी तिवसा- भातकुली यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक २५/०४/२०१६ रोजीच्या स्वतंत्र दोन पत्रांन्वये तिवसा, जि.अमरावती येथे मंजूर झालेल्या शासकीय मुलीच्या वसतीगृहाच्या नियोजित भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणे व मौजे शेंदूरजना बु., ता.तिवसा येथील ई वर्ग सर्व्हे क्र.११०/१ मधील २.२६ हे.आर जमिनीपैकी ०.५० हे.आर जमीन नाबार्ड अंतर्गत नविन शासकीय धान्य गोदामांचे बांधकामाकरीता देण्याची मागणी केली आहे. तसेच मौजे ममदापूर, ता.तिवसा येथील मंजूर आरोग्य केंद्राकरीता ई वर्ग जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६/०४/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.
तहसिलदार, तिवसा यांनी दि. ०८/०६/२०१७ च्या पत्रान्वये गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, तिवसा, ता.तिवसा यांना मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकामासाठी ई-वर्ग जमीन उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.
शेंदूरजना बु., ता.तिवसा येथील शासकीय धान्य गोदामांचे बांधकामाकरीता तसेच ममदापूर येथे आरोग्य केंद्र बांधकामासाठी ई वर्ग शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले दस्तऐवज तहसिलदार, तिवसा यांनी अनुक्रमे दि. १६/०७/२०१६ व दि. ०२/०१/२०१७ च्या पत्रांन्वये विविध शासकीय कार्यालयाकडून मागविले असून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौजे वडवली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.४१ या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत**

**(९) ८०००८ (१२-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडवली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.४१ या शासकीय जमिनीवरील अतिक्रमने नियमानुकूल करण्याबाबत शिवाजीनगर रहिवाशी संघाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये व त्यानंतर अनेक वेळा तहसिलदार, अंबरनाथ व जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे हे काय ,
(२) असल्यास, अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधीनीही उक्त जागेवरील अतिक्रमने नियमानुकूल करण्याबाबत मा.महसूल राज्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी व त्यानंतर अनेक वेळा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे निवेदने देऊन पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे वडवली ता.अबंरनाथ, जि.ठाणे येथील सर्वे नं.४१ या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत शिवाजी नगर रहिवासी संघाने दि.२४/०२/२०१५ रोजीचे निवेदन तहसिल कार्यालय अंबरनाथ यांचेकडे दिलेले आहे. तसेच मौजे वडवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील स. नं. ४१, न.भू.मा.क्र.८८५१, ८८६९ येथील शिवाजीनगर रहिवासी संघ यांचे निवासी प्रयोजनार्थ अस्तित्वात असलेले अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०६/०२/२०१८ रोजी शासनास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी प्रचलित नियमानुसार सर्व संबंधीतांच्या अभिप्रायासह विभागीय आयुक्त कोकण यांच्या मार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी निर्देश दिलेले असून सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**मौजे लोणी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील शासकीय जमीन मुस्लीम कब्रस्थानकरिता देणेबाबत**

**(१०) ८१६६४ (१२-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोणी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील शासकीय एफ वर्ग सर्वे क्र. ५१२ मधील ०.८० हे. आर. जमीनीचा मुस्लीम कब्रस्थानकरिता आगावू ताबा देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचा मुस्लीम कब्रस्थानकरिता ताबा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे लोणी, ता.नांदगाव खंडेश्वर येथील शासकीय फ वर्ग सर्व्हे क्र.५१२ मधील ०.८० हे.आर जमिनीचा आगाऊ ताबा मुस्लीम कब्रस्थानकरीता देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी लेखी निवेदनाव्दारे मागणी केली होती. सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात आली असून जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दि. १७/०१/२०१७ च्या आदेशान्वये मौजे लोणी, ता.नांदगाव खंडेश्वर येथील शासकीय फ वर्ग सर्व्हे क्र.५१२ मधील ०.८० हे.आर जमिनीचा आगाऊ ताबा दि. ०४/०५/२०१७ रोजी मुस्लीम कब्रस्थानकरीता सचिव, ग्रामपंचायत, लोणी यांना देण्यात आला आहे.

---

**वडाळा व फत्तेपूर (ता.नांदगाव खडेश्वर, जि.अमरावती) येथील ई-वर्ग जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत**

**(११) ८१६९५ (१२-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडाळा व फत्तेपूर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील ई-वर्ग जमिनीवरील अतिक्रमण तातडीने निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांच्याकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर ठिकाणची अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय, स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना दि. ०७/११/२०१६ च्या पत्रान्वये मौजे वडाळा, फत्तेपूर, ता.नांदगाव खडेश्वर, जि.अमरावती येथील ई-वर्ग जमिनीवरील अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे केली होती. तहसिलदार, नांदगाव खंडेश्वर यांनी त्यांच्या दि. ०३/११/२०१६ च्या पत्रान्वये मौजे वडाळा, फत्तेपूर, ता.नांदगाव खडेश्वर, येथील ई-वर्ग जमिनीवरील एकूण १७ अतिक्रमण धारकांनी केलेली अतिक्रमणे दि. ०७/११/२०१६ रोजी हटविण्याची कार्यवाही केली आहे.

---

**सिंदखेडराजा व देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) येथे प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(१२) ८३७१६ (१२-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा व देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) या तालुक्यांच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालय एकत्र आणण्याच्या दृष्टीने प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी प्रशासकीय इमारत बांधल्यास सदर तालुक्यातील जनतेला ते सोईचे ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी प्रशासकिय इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सिंदखेडराजा व देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) येथील अस्तित्वातील शासकीय कार्यालये विचारात घेऊन प्रशासकीय इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत जागेच्या उपलब्धतेनुसार निधी व निकषाच्या अधीन राहून कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

---

**मुलूंड-कुर्ला तहसिल कार्यालयाच्या (मुलुंड पश्चिम) सेतू सुविधा केंद्रातील गैरव्यवहाराबाबत**

**(१३) ८५१८० (१९-०८-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलूंड-कुर्ला येथील नागरीक, जेष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व जमिनीविषयक कागदपत्रे एकाच ठिकाणी मिळावेत यासाठी खासगी कर्मचारी नेमुन मुलूंड-कुर्ला तहसिल कार्यालयात (मुलूंड पश्चिम) सेतू सुविधा केंद्र सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेतू केंद्रातील कर्मचारी जी प्रकरणे दलालांमार्फत येतात तीच प्रकरणे पैसे घेऊन निकाली काढत असल्याची तक्रार भांडूप (पश्चिम) येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी मा.महसूल मंत्री यांच्याकडे लेखी पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणच्या सेतू केंद्रातील गैरव्यवहाराला आळा घालण्याबाबत व त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१) नाही, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष सेतू समिती उपनगर मुंबई यांनी मे. अभिषेक एन्टरप्रायजेस ठाणे यांना मुलुंड-कुर्ला तहसिल येथे सेतू सुविधा केंद्र चालविण्याकरिता दिनांक ६.०४.२००५ व ३०.०३.२०१० रोजी करारनामा करुन ठेका दिला होता.

(२) सदर सेतू केंद्रातील अनियिमिततेबाबत लोकप्रतिनिधींकडून तक्रार प्राप्त झाली होती.

(३) व (४) लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन सदर सेतू केंद्राच्या ठेकेदाराचा ठेका दिनांक ११.०१.२०१८ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा ममदापूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील मंजूर आरोग्य उपकेंद्राकरीता जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४) ८८०७१ (१२-०८-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा ममदापूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील मंजूर आरोग्य उपकेंद्राकरीता ई-वर्ग जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्रातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे ममदापूर, ता.तिवसा येथील मंजूर आरोग्य केंद्राकरीता “ई” वर्ग जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६/०४/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिल्याचे आढळून येत नाही. तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दि. १८/११/२०१५ रोजी सरपंच, ग्रामपंचायत, ममदापूर यांना उक्त विषयांकित प्रकरणी जमीन उपलब्ध करून देणेबाबत कळविले होते. त्यानुसार सरपंच/सचिव ग्रामपंचायत, ममदापूर यांनी दि.२६/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, तिवसा यांना ममदापूर गावाला लागूनच जमीन उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. त्याअनुषंगाने तहसिलदार, तिवसा यांनी दि. ०२/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती व इतर सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना त्यांचेशी संबंधित दस्तऐवज/नाहरकत/अभिप्राय/अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

---

**मौजा हिवरा बु.(ता.नांदगांव, जि.अमरावती) येथे हिंदु व आदिवासी स्मशानभुमी नसल्याबाबत**

**(१५) ८८८६७ (१२-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा हिवरा बु. (ता.नांदगांव खंडेशवर, जि.अमरावती) येथे हिंदु व आदिवासी स्मशानभुमी नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिवरा बु. येथील सर्वे नंबर ४ मधील १.९२ हे.आर. ही शासकीय जमीन हिन्दु व आदिवासी स्मशानभुमीकरिता मिळणेबाबत संबंधितांकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे हिवरा बु., ता.नांदगाव खंडेश्वर येथील सर्व्हे नं. ४ मधील क्षेत्र १.९२ हे.आर शासकीय जमीन हिंदु व आदिवासी स्मशानभुमीकरीता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१/१२/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सदरहू जमिनीचा आगाऊ ताबा हिंदु व आदीवासी स्मशानभुमीकरीता प्रदान करण्याबाबत दि.३१/०१/२०१८ रोजी आदेश पारित केला आहे.

---

**मिसाळवाडी (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(१६) ८९३५५ (१९-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिसाळवाडी (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील जमीन गट क्र. १८० मधील २३ आर व १८ आर जमीन टप्पा क ०३ आंचरवाडी ही जमिन डी वाय मध्ये गेलेली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदरहू जमिनीचा मोबदला जमिन मालकांस देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त जमिनीचा मोबदला तात्काळ जमीन मालकांस देणेबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उप विभागीय अधिकारी, तथा भूसंपादन अधिकारी, बुलढाणा यांचे अहवालानुसार या प्रकरणातील गट क्र.१८० मधील ०.२३ आर व ०.१८ आर संपादीत जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भात हरकत दाखल करण्यात आली होती. त्यानुसार उप अधिक्षक भूमि अभिलेख चिखली तसेच तहसिलदार, चिखली, मंडळ अधिकारी व तलाठी मौजे मिसाळवाडी संयुक्त अहवाल दिनांक २२.०८.२०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, तथा भूसंपादन अधिकारी, बुलढाणा यांचे कार्यालयास प्राप्त झाला. त्यानुसार संबंधित भूधारकांना गट नं.१८० मधील संपादीत क्षेत्र ०.२३ हे.आर व .१८ हे.आर जमिनीचा मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात पूरहानी दुरुस्ती अंतर्गत १५ रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्याबाबत**

**(१७) ९०२२४ (१२-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात पूरहानी दुरुस्ती अंतर्गत १५ रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजीच्या पत्राव्दारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती व कोणकोणत्या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :** (१) होय खरे आहे.

(२) व (३) मा. श्री. चंद्रकांत बळी राम सोनावणे वि.स.स. यांच्या निवेदनातील १५ कामांपैकी ५ कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. या मंजूर कामांची किंमत रु. २४०.०० लक्ष आहे. उर्वरीत कामे मंजूरी निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्गाच्या सुरक्षिततेसाठी 'इंटेलिजेन्ट हायवे मॉनीटरिंग' योजना राबविण्याबाबत**

**(१८) ९३११८ (१२-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- पुणे एकस्प्रेस महामार्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'इंटेलिजेन्ट हायवे मॉनीटरिंग' योजना श्री.तन्मय पेंडसे यांनी शासनास सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने तांत्रिक समिती नेमली असून समितीच्या दोन बैठकाही झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तांत्रिक समितीच्या बैठकांत सदरहू योजनेबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०७-२०१८) :** (१) होय. श्री.तन्मय पेंडसे यांनी गृह विभागाकडे निवेदन दिल्याचे आढळून येते.

(२) मुंबई-पुणे महामार्गावर सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली वाहतुक पोलीस परिवहन व माहिती तंत्रज्ञान विभागाचे सदस्य यांची समिती गठित करण्यात आली आहे. अपघात रोखण्यासाठी इंटेलिजन्टस ट्राफीक मॉनिटरी सिस्टीमबबात या समितीच्या यासंदर्भात दोन बैठका झाल्या आहेत.

(३) समितीने दिनांक २७.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असून खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत :-

i. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास किंवा परिवहन आयुक्त यांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करणे.

ii. सदर प्रकल्पास आर्थिक तरतूद करणे.

iii. प्रकल्प नियंत्रण समितीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मोटर वाहने विभाग, अतिरिक्त पोलीस महासंचालक, वाहतूक विभाग व माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांचे प्रतिनिधींचा समावेश असावा.

iv. KPMG कंपनीची project management consultant म्हणुन नेमणुक करावी व कंपनीने या कामाकरीता समर्पित गट निर्माण करावा जेणेकरुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, परिवहन विभाग व गृह विभाग यांचेशी समन्वय साधुन काम करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील जेएसडब्ल्यू उदयोग समूहाकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत**

**(१९) ९५१४४ (२१-१२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जेएसडब्ल्यू उदयोग समूहाने केलेल्या अनधिकृत उत्खननप्रकरणी ५६ कोटी रूपयांचा दंड शासनाने आकारला होता परंतु अदयाप त्याची वसुली झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दंडाची रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक विलंब लावण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दंडाची रक्कम वसूल करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून उक्त कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे जयगड (कुणबीवाडी), ता.जि.रत्नागिरी येथील मे.जे.एस.डब्ल्यू.पोर्ट लि. यांनी त्यांच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये केलेल्या अनधिकृत गौणखनिजावर स्वामीत्वधन व दंडापोटी रु.५६,३८,०६,९८२/- इतकी रक्कम ३०

दिवसात शासनजमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दि.५/१२/२०१४ रोजी पारित केले होते. सदर आदेशाविरुध्द सदर कंपनीने अपर विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे अपिल दाखल केले असता, अपर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे उपरोक्त आदेश दंडात्मक आकारणी पुरते रद्द करुन गौण खनिजाच्या उत्खननाच्या परिमाणासाठी स्वामीत्वधनाची आकारणी यापुर्वी अदा केली नसल्यास मे.जे.एस.डब्ल्यू.पोर्ट लि. यांनी शासनजमा करण्याबाबतचे आदेश पारित केले. त्यानुसार सदर कंपनीने स्वामित्वधनाची रक्कम रु.३,०८,७४,४००/- शासनजमा केली आहे.

अपर विभागीय आयुक्त, कोकण यांच्या सदरहू आदेशाविरुध्द उक्त कंपनीने शासनाकडे पुनरिक्षण अर्ज केला असता, प्रधान सचिव (अपील व रिव्हीजन) यांनी त्यांच्या दि.२२/६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर कंपनीने उत्खनन केलेल्या गौण खनिजापैकी किती ब्रास गौणखनिजास स्वामीत्वधनातून सूट आहे व किती ब्रास गौणखनिजावर स्वामित्वधन व दंड रकमेची वाजवी आकारणी करणे योग्य राहील याची जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी फेरचौकशी करावी,असे आदेश पारित केले आहेत. मे.जे.एस.डब्ल्यू. जयगड पोर्ट लि. या कंपनीने त्यांचेविरुध्द केलेल्या दंडनीय कारवाईविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले असून प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे हरियाली (मुंबई उपनगर) येथे बेकायदेशीररित्या बोगदा खोदून पोहोच रस्त्याचे काम केल्याबाबत

**(२०) ९७७३९ (२१-१२-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हरियाली (मुंबई उपनगर) येथील न.भू.क्र. ४ डी/ १ ते ४ डी ६, येथील सनसिटी निवासी संकुलालगतच्या डोंगरामध्ये बेकायदा बोगदा खोदण्यात आला असून सदर बोगदयातून वाहतुक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय किंवा येत आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी डोंगर पोखरून अवैध बोगदा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे हरियाली, ता.कुर्ला येथील स.नं.११२ पै.नं. भू.क्र.४ डी/१ ते ४, डी/६ येथे संबंधित विकासकाने बोगदा खोदून पोहोच रस्त्याचे काम केले असल्याचे दिसून आले. सदर खोदकामास महानगरपालिकेची परवानगी घेतली नाही व खोदकाम थांबविण्याची नोटीस देऊनही विकासकाने सदर खोदकाम बंद केले नाही म्हणून संबंधित विकासकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने पोलीस ठाणे, विक्रोळी पार्कसाईट येथे गुन्हा

दाखल केला असून, सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने बंद केले आहे. सदर रस्त्याचा वापर सार्वजनिक वाहतूकीकरिता होत नसून जमीन मालकाचे वाहन पार्कींगकरिता करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात शेतसारा न भरल्यामुळे जप्त झालेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(२१) ९७९२७ (२१-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शेतसारा न भरल्यामुळे जप्त झालेल्या आकारी पड जमिनींचा थकीत महसूल व त्यावर दंडव्याज भरल्यास त्या जमिनी शेतक-यांना परत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे येथील हजारो शेतक-यांना पुन्हा जमिनी मालकी हक्काने मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने किती शेतक-यांना आकारी पड जमिनी परत करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १८२ मध्ये सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२७, दि.२२/०८/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर सुधारीत तरतूदीन्वये

जिल्हाधिका-यांच्या व्यवस्थापनाखाली आलेल्या जमिनी मूळ मालकांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत करता येणे शक्य झाले आहे. मात्र त्याकरीता जिल्हाधिकारी यांनी विहित केलेल्या कालावधीत संबंधितांनी

जमीन महसूलाची थकबाकी आकारणी योग्य व्याजासह शासनास भरणे आवश्यक आहे. तसेच याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार संबंधितांनी जमिनीचा संभाव्य वापर विचारात घेऊन दंड, खंड व शास्ती या रक्कमांचा

भरणा करणेही आवश्यक आहे. या नविन सुधारणेनुसार व यासंदर्भात शासन राजपत्रात दि.०१/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमांनुसार आकारीपड जमीनी मूळ मालकांना प्रदान करण्याकामी अर्ज प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात

नियमानुसार कार्यवाही करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावर घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील सर्वे क्र.५७ हिस्सा क्र.५ या जागेचे बनावट दस्तएवेज तयार करून ७० लाख रूपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(२२) ९८७५५ (२१-१२-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील सर्वे क्र.५७ हिस्सा क्र.५ या जागेचे बनावट दस्तएवेज तयार करून ७० लाख रूपयांची फसवणूक करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त गैरव्यवहार करून फसवणूक करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महाड (जि.रायगड) येथील सर्वे क्र.५७ हिस्सा क्र.५ या जमिनीबाबत फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली नाही मात्र मौजे महाड येथील स.नं.५७/६ बाबत पोलीस निरिक्षक, महाड शहर पोलिस ठाणे येथे फसवणूकीबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणी नोंदणीकृत दस्ताऐवजाचे आधारे फेरफार मंजूर करताना योग्य रितीने पडताळणी न करता संबंधीत तलाठी व मंडळ अधिकारी यांनी हलगर्जीपणा व कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून आल्याने संबंधीत तलाठी यांना दिनांक १४.१२.२०१७ च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले आहे. तसेच मंडळ अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे चूकीच्या पद्धतीने मंजूर झालेला फेरफार पुनर्विलोकीत करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांनी उप विभागीय अधिकारी, महाड यांना दिनांक ०२.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

---

**कोळगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील श्रीमती पुष्पा बाबुराव जागते यांची नवीन शर्तीची हडप केलेली जमीन परत मिळण्याबाबत**

**(२३) ९९१६७ (२२-१२-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील श्रीमती पुष्पा बाबुराव जागते यांची नवीन शर्तीची हडप केलेली जमीन परत मिळण्याबाबत दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी मा.महसूल मंत्री यांना विधानसभा सदस्य, अचलपूर यांनी लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.मंत्री महसूल यांनी प्राधान्याने चौकशी करण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले होते परंतु जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून याप्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी तातडीने कार्यवाही करून श्रीमती पुष्पा बाबुराव जागते यांची नवीन शर्तीची हडप केलेली जमीन परत करण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१८) :** (१) होय. तथापि, सदर जमीन महार वतनाची नसून उप विभागीय अधिकारी, माढा विभाग, जि. सोलापूर यांच्या दि. ३०/१२/१९९२ रोजीच्या आदेशान्वये कायम लागणीसाठी दिलेली भोगवटादार वर्ग-२ संवर्गातील जमीन आहे.
(२), (३) व (४) श्रीमती पुष्पा बाबुराव जागते व रेखा बाबुराव जागते यांनी त्यांच्या हिश्श्यातील ग.नं.१२५/१ पैकी ० हे.४० आर इतकी जमीन श्री.अंकुश राजाराम भोसले यांना सक्षम प्राधिका-याची पूर्व परवानगी न घेता विक्री केलेली आहे. तसेच श्री. अमीत जागते व श्रीमती सारिका जागते यांनी ग.नं.१२५/१ पैकी त्यांच्या हिश्श्यातील ० हे.४७ आर इतकी जमीन अनोंदणीकृत कब्जेसाठेखताने श्री.अंकुश राजाराम भोसले यांना वहिवाटीस दिली होती. यासंदर्भात श्री. भोसले यांनी तहसिलदार, करमाळा यांच्याकडे केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने श्री.भोसले यांची सदर ० हे.८७ आर जमिनीमध्ये प्रत्यक्ष वहिवाट दिसून येत असल्याने तत्कालीन तहसिलदार, करमाळा यांनी त्यांच्या दि.२७/०४/२००७ रोजीच्या आदेशान्वये श्री.भोसले यांची सदर क्षेत्रावर वहिवाटदार म्हणून नोंद घेण्याचा आदेश पारीत केला होता. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन तहसिलदार, करमाळा यांनी श्री.भोसले यांचा वहिवाटदार म्हणून नोंद करणेबाबत पारीत केलेला दि.२७/०४/२००७ रोजीचा आदेश जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या निदेशानुसार उपविभागीय अधिकारी, माढा यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५८ अन्वये पुनर्विलोकनात घेऊन दि.२६/०४/२०१८ च्या आदेशान्वये रद्द केला आहे व प्रकरण फेरचौकशीसाठी तहसिलदार, करमाळा यांच्याकडे पाठविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोलाड महादेववाडी (ता.रोहा, जि.रायगड) व कालवण (ता.माणगाव, जि.रायगड) येथील आदिवासींच्या जमिनी बळकावल्याबाबत**

**(२४) १००९५७ (२२-१२-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोलाड महादेववाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील पांडुरंग लक्ष्मण जाधव व अन्य ५ कातकरी आदिवासींच्या जमिनीवर गैरआदिवासी कुटुंबांनी अतिक्रमण करून घरे बांधल्यामुळे अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी आदिवासींनी संबंधीतांकडे दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कालवण (ता.माणगाव, जि.रायगड) या गावातील मन्या हरी हिलम व अन्य पाच आदिवासी कुटुंबांच्या जमिनीही बळजबरीने व खोटे कागदपत्रे तयार करून बळकावल्याचे व

विक्री करून पैशांचा अपहार केल्याबाबत माणगाव पोलिस निरीक्षक तसेच उपविभागीय अधिकारी, माणगाव यांच्याकडे दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ व १० एप्रिल, २०१७ रोजी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या दोन्ही गावातील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावणाऱ्या विरुद्ध कारवाई करून या आदिवासी शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली
वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कोलाड, महादेववाडी ता. रोहा, जि.रायगड येथील श्री. पांडूरंग लक्ष्मण जाधव व इतर ५ या आदिवासी कुटूंबाच्या जागेत बिगर आदिवासींनी अतिक्रमण करुन घरे बांधल्याबाबतची तक्रार दिनांक २४.०३.२०१७ रोजी पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, कोलाड यांचेकडे दाखल झाली होती. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, रोहा यांनी जागेची अभिलेख व वहिवाट मोजणी करुन सदर आदिवासींच्या जमिनीत बिगर आदिवासींनी अतिक्रमण करुन घरे बांधल्याचे दिसून येत नसल्याचा अहवाल सादर केला आहे. तसेच दिनांक १३.०९.२०१७ च्या तक्रारीनुसार मौजे कालवण, ता.माणगांव, जि रायगड येथील श्री. मन्या हरी हिलम व अन्य ५ आदिवासी कुटुंबाच्या जमिनी दिल्ली मुंबई कॉरीडोर या प्रकल्पासाठी संपादित झाल्या असून सदर संपादनाच्या मोबदल्याच्या रक्कमांबाबत त्रयस्थ व्यक्तींनी अपहार केल्याबाबतची/फसवणूकीची तक्रार पोलीस निरिक्षक, माणगाव पोलीस ठाणे यांचेकडे केली असून याबाबत पोलीस निरिक्षक, माणगाव पोलीस ठाणे यांचेकडे तपास सुरु आहे.

---

## निम्न पेढी प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार मोबदला मिळण्याबाबत

**(२५) १०२८०९ (०६-०१-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अडनगाव, निंभा, वासेवाडी, कुंड खुर्द, कामूंजा, कुंड व इतर गावे या निम्न पेढी प्रकल्पबाधीत गावातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी लोकप्रतिनीधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे बैठक घेऊन योग्य त्या कार्यवाहीचा प्रस्ताव शिफारशीसह मा.मुख्यमंत्री व संबंधितविभागाचे मंत्री यांचेकडे पाठविला असुन वरील प्रकल्पाच्या बांधकामात गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी आंदोलनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१) होय.
प्रकल्पाच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) शासन अधिसूचना दि. २६/०५/२०१५ नुसार गुणांक घटक निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये शासन अधिसूचना दि. ०७/१०/२०१५, दि. २४/०४/२०१७, दि. २९/०८/२०१७ व दि. २४/११/२०१७ अन्वये वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत. तसेच गुणांक घटक लागू करण्याबाबत शासन सक्षम आहे. परंतु निम्नपेढी प्रकल्पासाठी समुचित शासन हे राज्य शासन असल्यामुळे केंद्रशासन अधिसूचना दि. ०९/०२/२०१६ मधील तरतूदी सदर प्रकरणाच्या भूसंपादनासाठी लागू होत नाहीत.
तसेच निम्नपेढी प्रकल्पाच्या संदर्भात जनहित याचिका मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आली असून सदर याचिका प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत असून बांधकामाबाबत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील १४ पुलांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यासाठी हुडको वित्त सहाय्यामधून निधी मिळण्याबाबत

**(२६) १०५९९४ (२७-०३-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील १४ पुलांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यासाठी हुडको वित्त सहाय्यामधून निधी मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुलांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याकरिता हुडको वित्त सहाय्यामधून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१) होय खरे आहे.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील पूलांच्या पुर्नबांधणी व संरचनात्मक दुरूस्तीसाठी वित्तीय संस्थांकडून कर्जसहाय्य घेणे विचाराधीन आहे.
सा.बां. विभागा अंतर्गत उपलब्ध असणा-या निधीमधून मंजूरी, निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार कामे हाती घेण्यात येत आहेत.

---

### नाशिक जिल्हा प्रशासनाने जातीचे दाखले ऑनलाईन देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२७) १०६०२६ (०४-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा प्रशासनाने जातीचे दाखले ऑनलाईन देण्याचा निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात त्रुटी राहिल्याने सर्वसामान्यांना जातीचे दाखले ऑनलाईन मिळण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ऑनलाईन जातीचे दाखले मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) जातीचे प्रमाणपत्र ही सेवा नाशिक जिल्हयात दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ पासून ऑनलाईन पध्दतीने डिजिटल स्वाक्षरी व्दारे नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. नाशिक जिल्हयात जातीचे दाखले ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यापूर्वी सर्व तांत्रिक अडचणी दूर करण्यात असल्याने ऑनलाईन पध्दतीने जातीचे दाखले देण्याबाबतची सेवा सुरळीत पणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील तलाठी कार्यालय नियमित सुरु राहत नसल्याबाबत

**(२८) १०६४२९ (२७-०३-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)देऊळगावराजा (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथील सार्वजनिक वाचनालयामागे असलेले तलाठी कार्यालय नियमित सुरु राहत नसल्याने नागरिकांची विविध कामे होण्यात अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार नायब तहसिलदार यांच्याकडे दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार सदरचे कार्यालय नियमित चालू ठेवण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी देऊळगांवराजा येथे भाग-१ व २ साझाचे तलाठी कार्यालय आहेत. देऊळगांवराजा भाग-१ येथील साझाचे तलाठी हे सेवानिवृत्त झाल्याने तेथे रिक्त पदाचा अतिरिक्त प्रभार अन्य तलाठी यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तसेच, देऊळगांवराजा भाग-२ साझाच्या तलाठी यांच्या संबंधित तक्रारी प्राप्त

झाल्यानंतर कारणे दाखवा नोटीस देवून नियमीत तलाठी कार्यालय सुरु ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. याबाबत संबंधित तलाठी यांना लेखी ताकीद देण्यात आली होती. त्यानंतर सदर कार्यालय नियमीत सुरु असल्याचे आढळून आले.

---

**बोरगाव मंजू (जि.अकोला) येथे विनापरवाना हॉटमिक्स डांबर प्लांट उभारल्याबाबत**

**(२९) १०६६५७ (२७-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव मंजू (जि.अकोला) येथे भाडयाने घेतलेल्या शेतात कोणतीही अकृषक परवानगी न घेता विनापरवाना हॉटमिक्स डांबर प्लांट उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महसूल प्रशासनामार्फत माहे डिसेंबर, २०१७ पासून चौकशी सुरु असून त्याबाबतचा चौकशी अहवाल उपविभागीय अधिकारी यांना सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बोरगाव मंजू येथील शेतात विनापरवाना हॉटमिक्स डांबर प्लांट उभारणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे बोरगाव मंजू, ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं.२९१/२ अ व सर्व्हे नं.२९१/२ ब मधील दोन जमीन धारकांनी त्यांचे मालकीची २.३६ हे. आर भोगवटदार वर्ग-१ जमीन अकृषक परवानगी न घेता इंटरबिल इंफ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीला हॉट मिक्स प्लांट, ऑफिस, लॅब व मेसचे बांधकाम करण्याकरीता भाडयाने दिली होती. सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दि. १४/१२/२०१७ च्या पत्रान्वये तहसिलदार, अकोला यांना अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते. तहसिलदार, अकोला यांनी त्यांच्या दि. २२/१२/२०१७ व दि. ०३/०१/२०१८ च्या पत्रांन्वये सादर केलेल्या अहवालानुसार उपविभागीय अधिकारी, अकोला यांनी दि. ०८/०२/२०१८ रोजी आदेश पारित करुन संबंधित जमीन मालकांनी विना परवानगी अवैधरित्या वाणिज्यिक प्रयोजनार्थ अकृषक वापर केल्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ नुसार रु. ०२,५४,८८०/- (अक्षरी रुपये दोन लाख, चौपन्न हजार, आठशे ऐंशी फक्त) इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्यात आली असून सदर रक्कम दि. ०५/०४/२०१८ रोजी शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

---

**निमगाव खलू (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे वाळू उपसा करणारी वाहने वाळू तस्करांनी पळविल्याबाबत**

**(३०) १०६८०२ (२७-०३-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव खलू (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील भीमा नदीपात्रात वाळू उपसा करताना महसुल प्रशासनाने जप्त केलेले जेसीबी व ट्रॅक्टर इ. वाहने वाळू तस्करांनी संबंधिताना दमदाटी करुन पळविली असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दमदाटी करुन जेसीबी व ट्रॅक्टर इत्यादी वाहने पळविणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१) होय, असे दि.१२ जानेवारी,२०१८ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) व (३) याबाबत संबंधित वाहनांचे मालक व चालक यांचे विरुध्द श्रीगोंदा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील तलाठी व मंडळ अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी हजर राहत नसल्याबाबत**

**(३१) १०७११३ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील बहुतांश तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी नेमलेल्या ठिकाणी दररोज हजर राहत नसल्यामुळे सामान्य नागरिकांना विविध कामे करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे तसेच काही ठिकाणच्या तलाठयांकडून सातबारा उतारा, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला इत्यादी देताना हेतु पुरस्कर विलंब लाऊन जास्त पैशांची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मुख्यालयाच्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक असल्याचे परिपत्रक जाहिर करुन सुध्दा परभणी जिल्हयातील बहुतांश तलाठी व मंडळ अधिकारी नेमणुकीच्या ठिकाणी हजर नसतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार परभणी जिल्हयातील मुख्यालयाच्या ठिकाणी हजर नसणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) परभणी जिल्ह्यात तलाठ्यांना २३९ व मंडळ अधिकारी यांना ३९ कार्यालये मंजूर आहेत. त्यापैकी तलाठी यांची शासकीय इमारतीत १ व खाजगी जागेत २३८ अशी एकूण २३९ कार्यालये तसेच मंडळ अधिकारी यांची शासकीय १ व खाजगी जागेत ३८ अशी एकूण ३९ कार्यालये कार्यरत आहेत. याप्रमाणे कार्यालयांना शासकीय कार्यालयात जागा उपलब्ध नसल्याने तलाठी व मंडळ अधिकारी त्यांच्या सज्जाच्या ठिकाणी खाजगी कार्यालये भाडे तत्वावर घेवून सज्जाच्या ठिकाणी उपस्थित राहतात. तसेच शासनाने सर्व गा.न.नं.७/१२ उताऱ्यांचे संगणकीकरणाचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी प्रत्येक महसूल मंडळामध्ये लिझ लाईन उपलब्ध करुन गा.न.नं.७/१२ चे संगणकीकरणाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने तालुका मुख्यालयी तसेच प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयात कॅम्प आयोजित करुन गा.न.नं.७/१२ चे संगणकीकरणाचे काम करण्यात येत आहे. ज्यामुळे अनेकदा तलाठी सज्जा मुख्यालयी हजर न राहता कॅम्पच्या ठिकाणी हजर राहून काम करत आहेत. तसेच जिल्हयातील तलाठी अथवा मंडळ अधिकारी हे सातबारा उतारा, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला इ. देतांना हेतूपूरस्पर विलंब लावून पैशाची मागणी करीत असल्याचे तसेच ते दररोज मुख्यालयी हजर राहत नसल्याबाबतच्या तक्रारी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्याच्या निदर्शनास आल्या नाहीत. तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडून आधार आधारीत बायोमेट्रीक हजेरी यंत्र पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील गौण खनिजांची वसुली करण्याबाबत**

**(३२) १०७१८४ (२७-०३-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील सन २०१७ मधील गौण खनिजांची वसुली माहे डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार श्रीगोंदा तालुक्यातील गौण खनिजांची वसूल तातडीने करण्याबाबत तसेच वसुलीस विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) श्रीगोंदा तालुक्यासाठी सन २०१७-२०१८ करीता गौणखनिज वसुली उद्दीष्ट रु.७,१६,००,०००/- इतके निश्चित करण्यात आले होते. सदर उद्दिष्टापैकी माहे डिसेंबर, २०१७ अखेर रु.४,५०,४७,०९६/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली. तसेच मार्च, २०१८ अखेर एकूण रक्कम रु.८,१४,४९,६६०/- वसुल झालेली आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये गौण खनिजापासून प्राप्त झालेला महसूल हा नेमून दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे ११३.७६ टक्के आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कर्नाटक-महाराष्ट्र हद्दीतून बेळगाव येथे बेकायदा वाळू पुरवठा होत असल्याबाबत

**(३३) १०७३३१ (२७-०३-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताम्रपर्णी तसेच मार्कंडेय या कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याच्या सिमेवरील नाल्यातून मोठया प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा करुन बेळगाव येथे पाठविला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतून बेळगाव येथे बेकायदा वाळू वाहतूक करणाऱ्यांवर तसेच यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील ताम्रपर्णी व घटप्रभा या नद्यांमध्ये वाळूसाठे उपलब्ध नाही. मार्कंडेय नदी चंदगड तालुक्यातील सुरुते या गावाच्या सिमेतून जात असून तेथेही वाळूसाठे नाहीत. वाळू उपसा करुन कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे अवैधरित्या वाळू पाठविली जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुनतगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीच्या गावठानातून बेकायदेशीर मुरुम उचलल्याबाबत

**(३४) १०७९१६ (२७-०३-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुनतगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीच्या गावठानातून बेकायदेशीर मुरुम उचलल्याने संबंधित ठेकेदारावर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दंड ठोठावण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) सल्यास, पुनतगाव सरपंच व ग्रामपंचायतीने सदर ठेकेदाराशी संगनमत करून मुरुम देण्याबाबत बेकायदेशीर ठराव केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१) मौजे पुनतगाव येथील गावठाण ग.नं.९२/२ ब मधून दि.११/०९/२०१७ रोजी अनधिकृतपणे उत्खनन करुन १२.५० ब्रास मुरुम काढल्याचे निदर्शनास आल्याने तहसीलदार, नेवासा यांनी संबंधितांविरुध्द रु.६७,६२५/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.२७/११/२०१७ रोजी पारित केले असून त्यानुसार संबंधिताकडून रु.६७,६२५/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करुन शासन जमा करण्यात आली आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामाकरीता गट नं.९३/१ मधून मुरुम उत्खननास मंजूरी देण्याबाबतचा ठराव ग्रामसभा, पुनतगाव यांनी दि.२/१०/२०१७ रोजी पारित केला होता. तथापि, असे अधिकार नसल्याचे निदर्शनास आल्याने सदर ठराव दि.३०/१/२०१८ रोजीच्या ग्रामसभेच्या ठरावाद्वारे रद्द करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे वाशिंद (पश्चिम) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील साईनगर-मुरबाड रोड वरील नागरिकांना येण्या जाण्याकरीता रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) १०८०२४ (२७-०३-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाशिंद (पश्चिम) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील साईनगर-मुरबाड रोड सर्व्हे नं. ७४/२ मध्ये कायदेशीर परवानगी घेवून पूर्ण केलेल्या इमारतीकरीता येण्या-जाण्याचा रस्ता बेकायदेशीर लोखंडी गेट लावून बंद केल्यामुळे स्थानिक रहिवाश्यांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे, तहसिलदार, शहापूर व अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल यांचेकडे दिनांक ३ नोव्हेंबर,२०१७ रोजी सर्व कागदपत्रांसह निवेदनाद्वारे याबाबत तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची तक्रार श्री.रमाकांत कुश्या सातपुते व इतर यांचे कुलमुखत्यार श्री.संतोष पितांबर कुरीयाली यांनी दिनांक ०४/०७/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली होती. त्यानुषंगाने सदर प्रकरणी मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ चे कलम ५ यातील तरतूदीनुसार तहसिलदार, शहापूर

यांचेकडील क्र.मामलेदार कोर्ट/वहिवाट दावा क्र. ०१/२०१७, दिनांक २०/०४/२०१७ नुसार आदेश पारीत करण्यात आले आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची संबंधितांची मागणी असून सदरील आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन घेण्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने जे. एस. डब्ल्यू. स्टिल कोटेड प्रोडक्टस लि. वाशिंद यांनी बंद केलेला रस्ता खुला करुन दिला आहे.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यामधील महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३६) १०८२१६ (२७-०३-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी पदांच्या ४, नायब तहसिलदार पदांच्या १०, तलाठी पदांच्या ३४ तसेच 'क' व 'ड' वर्गातील सरळसेवा व पदोन्नतीच्या ४२ जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१८) :** (१) व (२) उस्मानाबाद जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी - ३, तहसीलदार - २ व नायब तहसीलदार- ५ तसेच तलाठी संवर्गात - ३५ व गट क व ड संवर्गात एकुण- ४७ इतकी पदे रिक्त आहेत. शिपाई संवर्गातून लिपिक संवर्गात पदोन्नती देण्याकरीता जिल्हा पदोन्नती निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पदवी उत्तीर्ण असलेले केवळ ३ शिपाई पदोन्नती साठी पात्र ठरले त्यामुळे या संवर्गात ३७ पदे रिक्त आहेत.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.२०१५/प्र.क्र.४१/अर्थ- १, दि. ०२ जून, २०१५ मधील तरतुदीनुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांपैकी ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी जे कमी असेल तेवढी पदे सरळसेवेने भरण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींच्या जमिनी खरेदी विक्रीबाबतचे अधिकार विकेंद्रित करण्याबाबत**

**(३७) १०८५२५ (२७-०३-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे),**

**श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींच्या जमिनी स्थानिक व छोटया शासकीय विकास कामांसाठी खरेदी करताना, बक्षिस पत्र वा तत्सम हस्तांतरणाच्या माध्यमातून उपलब्ध करुन घेण्यासाठी मंत्रालयस्तरावर परवानगी घ्यावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची किती प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित आहे,

(३) असल्यास, सदर परवानगीबाबतची अनेक प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित असल्याने सदरची परवानगी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी वा उपविभागीय अधिकारी यांचेकडे विकेंद्रीत करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या अधिकार विकेंद्रीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) व (२) राज्यातील आदिवासी व्यक्तींच्या जमिनीच्या वहिवाटीचे बिनशेती प्रयोजनार्थ बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरण अनुज्ञेय असून असे हस्तांतरण करण्याकरीता राज्य शासनाची पुर्वमान्यता घेणे कायद्यानुसार अनिवार्य आहे.

आदिवासी व्यक्तींच्या जमिनी स्थानिक व छोट्या शासकीय विकास कामांसाठी खरेदी करताना, बक्षिसपत्र वा तत्सम हस्तांतरणाच्या माध्यमातून उपलब्ध करून घेण्यासाठी शासनस्तरावर प्रकरणे प्रलंबित नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्हयातील विविध महामार्गावर १३७ अपघातजन्य ठिकाणे असल्याबाबत

**(३८) १०८५३२ (२७-०३-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील विविध महामार्गावर १३७ अपघातजन्य ठिकाणे असल्याचे गत तीन वर्षातील अपघातावरुन निष्पन्न झाले असून यातील ४ ठिकाणे ही वारंवार व भीषण अपघातजन्य असल्याचे जिल्हा पोलीस दलाने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातग्रस्त ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपाययोजना केलेल्या नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपघातजण्य ठिकाणी अपघात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१८) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही,
उपरोक्त ४ अपघातजन्य ठिकाणे अहमदनगर ते कोपरगांव हया रस्त्यावर असून त्या ठिकाणी रम्बलिंग स्ट्रीप्स व सूचनाफलक बसविणे हया तात्पुरत्या उपाययोजना सवलतकारामार्फत करण्यात आलेल्या आहेत.
(३) अहमदनगर जिल्हयातील चार अपघातजन्य ठिकाणांच्या दुरुस्ती कार्यक्रम परिवहन विभागास निधी उपलब्धेसाठी सादर करण्यात आला असून, निधीच्या उपलब्धतेनंतर कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील नागरी सुविधा केंद्र चालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(३९) १०८९३० (२७-०३-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील नागरी सुविधा केंद्र चालकांकडून कराराचे उल्लंघन करून नागरीकांना विविध दाखले देताना विलंब लावला जात असल्याचे तसेच नेमून दिलेल्या शुल्का व्यतिरीक्त अधिकचे पैसे आकारुन नागरिकांची फसवणुक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुजरात इन्फोटेक या सेतु कंत्रांटदार संस्थेसह जिल्हयातील इतर कंत्राटदार संस्था, महा ई सेवा केंद्राच्या कारभाराबाबत नागरीकांच्या आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासनाने सेतु चालकावर दंड आकारुन कारवाई देखील केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून नाशिक जिल्हयातील सेतू सुविधा केंद्रावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नाशिक जिल्हयातील नाशिक शहर व नाशिक तहसिल ग्रामीण येथील सेतू केंद्र, ई- निविदा प्रक्रियाव्दारे गुजरात इन्फोटेक लि. अहमदाबाद यांना तर उर्वरित १४ तहसील सेतू केंद्र मे. टेरा सॉफ्टवेअर लि. हैदाराबाद या अभिकर्त्यांना दि. १ एप्रिल २०१६ पासून मंजूर करण्यात आले आहेत. सदर संस्थेस निविदा मंजूर करतांना व कार्यारंभ आदेश देताना आवश्यक त्या अटी व शर्ती निश्चित करुन देण्यात आल्या होत्या. गुजरात इन्फोटेक लि. व्दारा नाशिक तालुक्यात चालविल्या जाणाऱ्या सेतू

केंद्रातील कामकाजातील अनियमतेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तदषंगाने चौकशी करुन निफाड, सुरगाणा, नाशिक, इगतपूरी व देवळा येथील सेतू केंद्रावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. नाशिक शहर व नाशिक तहसील ग्रामीण येथील सेतू केंद्रातील कामकाजाबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याने, करण्यात आलेल्या चौकशीत गुजरात इन्फोटेक लि. कंपनी यांनी निविदा व कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीचे पालन केले नसल्याचे आढळून आल्याने त्यांना मंजूर केलेली नाशिक शहर व नाशिक तहसिल ग्रामीण येथील पाच सेतू केंद्रे याचे कामकाज सदर कपंनीकडून दि. ५.०३.२०१८ च्या जिल्हाधिकारी, नाशिक यांचे आदेशान्वये काढून घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरूर (जि.बीड) तालुक्यात विविध शासकीय विभागांची कार्यालये कार्यान्वित झाली नसल्याबाबत

**(४०) १०९०४३ (१४-०५-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरूर (जि.बीड) तालुक्याच्या नवनिर्मितीनंतर अद्यापपर्यंत कोषागारे कार्यालय, जलसंधारण (जि.प.), बांधकाम (जि.प.) इत्यादी विविध शासकीय विभागाची कार्यालये कार्यान्वित झालेली नसल्याने स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरूर (जि.बीड) तालुक्याच्या नवनिर्मितीनंतर अद्यापपर्यंत विविध शासकीय विभागाची कार्यालये कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) शिरुर तालुक्यातील जनतेच्या गरजेची व दैनंदिन कामकाजाशी संबंधित १४ कार्यालयांपैकी उपकोषागार कार्यालयासह एकूण १० कार्यालये स्थापन करण्यात आली असून उर्वरीत ४ तालुका कार्यालये स्थापन करण्याबाबत संबंधित विभागाना कळविण्यात आले आहे.

---

## नेव्हाळी जवळील खोणी (जि.ठाणे) येथील सर्वे नं १२९ या नौदलाच्या आरक्षित भूखंडावर मंदिर बांधण्यात येत असल्याबाबत

**(४१) १०९०८९ (२७-०३-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेव्हाळी जवळील खोणी (जि.ठाणे) येथील सर्वे क्र. १२९ या नौदलाच्या आरक्षित भूखंडावर ग्रामस्थांनी मंदिर उभारण्याचे काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त भूखंडावर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :** (१) मौजे खोणी, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. १२९ या मिळकतीच्या अधिकार अभिलेख गाव नमुना नंबर ७/१२ वर भोगवटादार सदरी 'विमानतळ' अशी नोंद असून सदर मिळकतीवर काही जागेत ग्रामस्थांनी गावदेवी मंदीर उभारले आहे.
(२), (३) व (४) सदर जमीन केंद्र सरकारच्या नौदल विभागाच्या अखत्यारीत असून शासकीय जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे ही सदर जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे सदर जमिनीवर झालेल्या बांधकामावर प्रचलित शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, कल्याण यांनी केंद्र सरकारच्या नौदल विभागास कळविले आहे.

---

**चौकटपाडे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील शेतक-याने केलेल्या आत्महत्येबाबत**

**(४२) १०९५०८ (२७-०३-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौकटपाडे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील शेतक-याने कर्जास कंटाळून दिनांक २५ ऑगस्ट, २०१७ रोजी आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर तब्बल दोन महिन्यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्याबाबतचा अहवाल सादर केल्यामुळे दप्तर दिरंगाई केल्याबद्दल तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हसुरुळ (ता.जि.नाशिक) येथील एका वयोवृध्द शेतक-याने वहिवाट रस्ता खुला करुन मिळत नसल्याने माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री यांना लेखी निवेदनाव्दारे आत्महत्या करण्यास अनुमती मिळणेबाबतचे निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या दोन्ही प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मौजे चौकटपाडे, ता. मालेगांव, जि.नाशिक येथील शेतकरी आत्महत्येनंतर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत झालेल्या विलंबाबाबत संबंधित तलाठी चौकटपाडे व मंडळ अधिकारी, निमगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक यांच्याविरुध्द अनुक्रमे उपविभागीय अधिकारी, मालेगांव, जि.नाशिक व जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या स्तरावर विभागीय चोकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

अन्य प्रकरणी श्री. गंगाधर मुरलीधर सागर, रा.म्हसरुळ, ता.जि.नाशिक यांनी वहिवाट रस्ता मिळत नसल्यामुळे कुटुंबियांसमवेत आत्मदहन करण्यास संमती मिळण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे सादर केलेली निवेदने जिल्हाधिकारी, नाशिक यांना आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली होती.

त्यास अनुलक्षून, तहसिलदार, नाशिक यांनी दिनांक २६.१२.२०१७ व दिनांक ०८.०२.२०१८ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १४३ मधील तरतूदीनुसार तहसिलदार, नाशिक यांचे न्यायालयात रितसर अर्ज दाखल करण्याबाबत अर्जदारास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (जि.नांदेड) येथील नायब तहसीलदारांनी अधिकारकक्षेत नसलेला स्वाक्षरीचा शिक्का वापरल्याबाबत

**(४३) ११०१४४ (२७-०३-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) येथील नायब तहसीलदारांनी वाळू वाहतूक करण्यासाठी लागणा-या बारकोड असलेल्या पावतीवर अधिकारकक्षेत नसलेला स्वाक्षरीचा शिक्का वापरल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उपरोक्त प्रकरणी दोषी असणा-या नायब तहसीलदार व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नायगाव (जि.नांदेड) येथील संबंधीत नायब तहसीलदार यांना अर्धांगवायूचा झटका आल्यामुळे त्यांचा उजवा हात काही प्रमाणात निकामी झाला आहे. तसेच सदर कालावधीत अन्य एक नायब तहसीलदार रजेवर असल्याने संबंधीत नायब तहसीलदार हे नायब तहसीलदार म्हणून एकटेच कार्यरत होते. उक्त कालावधीत अवैध रेतीसाठ्याची लिलाव प्रक्रिया सुरु असल्यामुळे व वाळू वाहतूकीसाठी बारकोड असलेल्या मूळ पावत्या मोठ्या प्रमाणात असल्याने सदर पावत्यांवर मूळ सह्या करणे उजवा हात काही प्रमाणात निकामी झाल्यामुळे संबंधीत

नायब तहसीलदार यांना शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी वरिष्ठांची परवानगी न घेता पावतीवर सही करण्याऐवजी शिक्के मूळ पावत्यांवर वापरले आहेत. सदरची कृती ही शारीरिक व्यंगामुळे केली असल्याने व या काळात मोठ्या प्रमाणात वाहतूक पासेसवर मूळ सह्या करणे शक्य नसल्याने घडली असल्याने संबंधित नायब तहसीलदार यांचेवर सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) पूर्वेकडील मलंग रोड नांदिवली तलावालगत असलेल्या शासकीय भूखंडाबाबत

**(४४) ११०२४४ (२७-०३-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलंग रोड नांदिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) तलावालगत असलेल्या शासकीय भूखंडावर उभारण्यात आलेल्या सुमारे २०० घरांना तहसिल कार्यालयाकडून नोटीसा बजावण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी वास्तव्यास असणारे नागरिक कर भरत असून त्यांनी या नोटीसांना विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या नागरिकांना पर्यायी घरे देण्याबाबत अथवा सदरची बांधकामे नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :** (१) व (२) मौजे नांदिवली तर्फे अंबरनाथ, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ८ (क्षेत्र ४-८५.०० हे-आर) आणि स.नं. ९ (क्षेत्र १०-१०.०० हे-आर) या भूखंडावरील एकूण ९२ अतिक्रमणधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५०(३) प्रमाणे अतिक्रमण निष्कासनाच्या नोटीस बजावण्यात आल्या असून त्यापैकी एकूण ४७ अतिक्रमणधारकांनी सदर नोटीस स्वीकारण्यास नकार दिला आहे. उक्त ९२ अतिक्रमणधारकांपैकी एकूण २१ मिळकतींना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून कर आकारणी झालेली असून त्यापैकी १० मिळकतदार कराचा भरणा महापालिकेस करत आहेत.
(३) व (४) उक्त जमिनीवर केलेली बांधकामे नियमित करण्याकरिता अर्ज करुन आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधितांची आहे. संबंधितांनी याबाबत कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नसल्यामुळे संबंधितांना पर्यायी घरे देण्याबाबत अथवा संबंधितांची सदर बांधकामे नियमित करण्याबाबतची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील शांतीधाम येथील इरई नदी पात्रात श्री. बालाजी कन्स्ट्रक्शन, यवतमाळ अवैध उत्खनन करीत असल्याबाबत**

**(४५) ११०८४१ (०४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील शांतीधाम येथील इरई नदी पात्रामध्ये सन २०१६ पासून श्री.बालाजी कन्स्ट्रक्शन, यवतमाळ यांच्याकडून बांधकाम सुरू असून या करीता इरई नदीतील रेतीचे विनापरवाना उत्खन्नन करून वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या बांधकामासाठी महानगरपालीकेची वीज सुध्दा वापरण्यात येत असून नित्कृष्ट दर्जाचे काम करण्यात येत असल्यामुळे त्याबाबत संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, चंद्रपूर यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०६-२०१८) :** (१), (२) व (३) श्री.बालाजी कन्स्ट्रक्शनच्या कंत्राटदाराकडून इरई नदीतून अवैधरित्या उत्खनन करुन बांधकामात रेतीचा वापर होत असल्याची बाब तहसीलदार, चंद्रपूर यांनी केलेल्या चौकशीत आढळून आली नाही. तथापि, शांतीधाम, बिनबा गेट, चंद्रपूर येथे इरई नदीच्या पात्रात होत असलेल्या कामामध्ये अवैधरित्या रेती उपसणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, चंद्रपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे दि.११ जानेवारी, २०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत बालाजी कन्स्ट्रक्शन या कंत्राटदराकडून बांधकामासाठी आतापर्यंत २० ब्रास रेती वाहतूक परवान्याद्वारे आणली असून गौण खनिज वाहतूक परवानासंबंधीत पावत्या तहसीलदार, चंद्रपूर यांचेकडे सादर केल्याचे आढळून आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) १११२०१ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील अनेक सज्जावरील तलाठी संवर्गाची पदे रिक्त असून या पदांचा अतिरिक्त पदभार इतर कर्मचाऱ्यांवर दिल्यामुळे नागरिकांची अनेक कामे प्रलंबित झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, लातूर ग्रामीण यांनी उप विभागीय अधिकारी, रेणापूर यांच्याकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या आढावा बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेणापूर तालुक्यात तलाठ्यांची किती पदे रिक्त आहेत व सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) रेणापूर तालुक्यात एकूण २५ तलाठी पदे मंजूर आहेत. त्यापैकी २२ पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार लगतच्या तलाठयाकडे देऊन नागरीकांची कामे वेळेत करण्यात येत आहेत. सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, लातूर ग्रामीण यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या आढावा बैठकीत केली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि.२५/०५/२०१७ अन्वये विभागाने सुधारीत आकृतीबंध मंजूर करुन घेतल्याखेरीज पदभरतीस बंदी आहे. तथापि, याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) १११८६५ (२७-०३-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था झाल्याने विश्रामगृहाचे तातडीने नुतनीकरण करण्याबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनीधीनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांना दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विश्रामगृहात पावसाळ्यात पाणी गळती होत असून विश्रामगृहाच्या खिडक्या, दरवाजे तसेच शौचालय यांची दुरवस्था झाली असल्याचे तसेच विश्रामगृहात अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी कक्ष नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार विश्रामगृहाचे तातडीने नुतणीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१) होय.
(२) पावसाळ्यात पाणी गळती ही फक्त इमारतीच्या दर्शनी भागातील व्हरांड्यामध्ये होत असून या गळतीमुळे विश्रामगृहाच्या खिडक्या, दरवाजे तसेच शौचालय यांची दुरवस्था झालेली नाही. तसेच विश्रामगृहात अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी कक्ष अपुरे आहेत.
(३) व (४) विश्रामगृहामधील अस्तित्वातील कक्षांची संख्या विचारात घेऊन नुतनीकरणांचे नियोजन निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यांत येईल.

---

**अकोला-नांदेड या राष्ट्रीय महामार्गाच्या भुसंपादनाबाबत**

**(४८) ११२५४३ (२७-०३-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला-नांदेड या राष्ट्रीय महामार्गासाठी भुसंपादनाची कार्यवाही करताना प्रत्यक्ष जमीन मोजनीच्या वेळी अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांच्या ताब्यात असताना सुद्धा त्यांच्या ७/१२ वर दुसऱ्याच शेतकऱ्यांची नावे दिसून आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन अभिलेखे अद्यावत करण्यात न आल्यामुळे सदर प्रकार घडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अकोला व वाशिम जिल्हातील संपादीत जमिनीचे अभिलेखे अद्ययावत असल्यामुळे असा कोणताही प्रकार घडलेला नाही.
हिंगोली जिल्ह्यातील संपादीत करण्यात आलेल्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर ताब्याप्रमाणे ३४ शेतकऱ्यांची नावे दिसून येत नाही. परंतु त्यांची नावे दुसऱ्या ७/१२ गटावर नमूद आहेत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी सक्षम अधिकारी, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे अपिल करून दुरूस्ती करणे अभिप्रेत आहे. अपील मध्ये ७/१२ दुरूस्तीबाबत आदेश झाल्यास त्यानुसार ७/१२ दुरूस्तीची प्रक्रीया करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपुर जिल्ह्यातील वाळु घाटांच्या लिलावाबाबत**

**(४९) ११३०१८ (२७-०३-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने चंद्रपुर जिल्ह्यातील वाळु घाटांचे लिलाव करून ८० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दीष्ट पुर्ण करण्याबाबत कळवीले होते परंतु माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत केवळ ५८ घाटांचा लिलाव करण्यात आल्याचे निदर्शनास आले असून येथील कंत्राटदार शासनाने निर्धारीत केलेल्या रेती घाट व खदानी वरून उत्खनन न करता अवैधरित्या जवळच्या ठिकाणावरून उत्खनन करून माल उचल करीत असल्याने व याबाबत तलाठ्यांची भूमिका संशयास्पद असल्याने शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर शहरात परवानगीपेक्षा जास्त रेती भरुन वाहतूक करणा-या तीन हायवा ट्रकसह जमा केलेल्या जवळपास ८५० ब्रास रेतीवर तहसिलदार संतोष खांडरे यांनी दंड आकारण्याबाबत नोटीस बजावून कारवाईचा केवळ देखावा केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या दोन्ही प्रकरणातील संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १२३ वाळूघाटांपैकी दि.१२/३/२०१३ रोजीच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार ५८ वाळूघाट लिलावात विक्रीस गेलेले आहेत. त्यापासून शासनास रु.९.४४ कोटी इतका महसूल प्राप्त झालेला आहे. तद्नंतर दि.३/१/२०१८ रोजीच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणानुसार ६५ वाळूघाटांपैकी ३४ वाळूघाट लिलावात विक्रीस गेलेले आहेत. त्यापासून शासनास रुपये ८.९७ कोटी इतका महसूल प्राप्त झाला आहे. तर गौण खनिजापासून मार्च, २०१८ अखेर रु.५४.३१ कोटी असा एकूण रु.७२.७२ कोटी इतका महसूल प्राप्त झाला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात "गौण खनिज उत्खनन व नियंत्रण प्रणाली"चा अवलंब करण्यात येत असल्याने उत्खनन करावयाच्या मंजूर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करणे सहज शक्य होत नाही.

(२), (३) व (४) चंद्रपूर शहरात परवानगीपेक्षा जास्त वाळू भरुन वाहतूक करणाऱ्या तीन ट्रकवर तहसीलदार, चंद्रपूर यांनी दंडात्मक कार्यवाही करुन रु.३३,६०० इतका दंड वसूल केला आहे. तसेच दि.९ जानेवारी, २०१८ रोजी चंद्रपूर येथे वन अकादमीचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी ८५० ब्रास वाळूसाठा आढळून आल्याने संबंधिताविरुध्द स्वामित्वधन व दंडापोटी रु.७१,४०,०००/- इतक्या रक्कमेचे तहसीलदार, चंद्रपूर यांनी आदेश पारीत केले असून सदर रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात शेतक-यांना सातबारा उतारा देण्यासाठी तलाठी पैशांची मागणी करत असल्याबाबत**

**(५०) ११३०४८ (२७-०३-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतक-यांचे बोंडअळीमुळे नुकसान झाले असुन त्यांना भरपाईसाठी अर्जासोबत जोडण्यासाठी व अन्य कारणामुळे सातबा-यांची आवश्यकता भासते त्यामुळे शेतकरी संबंधित तलाठयाकडे गर्दी करीत असुन सदरहू तलाठी शेतक-यांची निकड ओळखून प्रत्येक सात-बारा उता-यासाठी ५० रुपयांची मागणी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांची सोय व्हावी, दलाल व कर्मचा-यांकडून त्यांची लूट होऊ नये यासाठी शासनाने सर्व कामकाज ऑनलाईन करतांना सर्वत्र महा-ई-सेवा केंद्र सुरु केले असून या ठिकाणी सातबाराची प्रत २० रुपयांत मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित नुकसानग्रस्त शेतक-यांना सातबारा देण्याबाबत तसेच सातबारा देण्यात गैरव्यवहार करणा-या कर्मचा-यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) सद्यस्थितीत, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. योजना-२०१३/प्र.क्र.९३/ई-१०, दिनांक १८.०३.२०१४ मधील तरतूदीनुसार राज्यातील “ई-चावडी” व “ई-फेरफार”या योजनेंतर्गत तलाठ्यामार्फत संगणकावरुन देण्यात येणाऱ्या गा.न.नं. ७/१२ उताऱ्याच्या प्रती वितरित करताना प्रती उताऱ्यास रु. १५/- इतके शुल्क आकारले जाते.

ज्या तालुक्यामध्ये रि-एडिटचे काम पूर्ण झाले आहे व जेथे संबंधित जिल्हाधिकारी यांनी डिजिटल सिग्नेचरबाबत तांत्रिक पूर्तता केली आहे, त्या तालुक्यातील डिजिटली साईन्ड गा.न.नं.७/१२ उतारे, नागरीकांकडून रु. २०/- + सेवा कर आकारुन “आपले सरकार” पोर्टलवरुन डाऊनलोड करुन महा ई-सेवा केंद्रामार्फत वितरीत करण्यात येतात. तसेच नागरीकही सदर तालुक्यातील डिजिटली साईन्ड गा.न.नं.७/१२ उतारे “आपले सरकार” पोर्टलवरुन थेट घरबसल्या ऑनलाईन डाऊनलोड करुन घेऊ शकतात.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.